पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

---

# वार्तापत्र

**दिनांक: २०/११/२०२०**

# पोलीस विभागाच्या माध्यमातुन ३९ बेरोजगार तरुणांची सुरक्षा रक्षक म्हणुन निवड

गडचिरोली जिल्ह्यातील दुर्गम- अतिदुर्गम भागातील तरुण- तरुणींना अनेक समस्यांना तोंड देत, आपले जीवन व्यथीत करावे लागत असते. नक्षलवाद्यांचा विकास कामांना होत असलेला विरोध त्यामुळे सर्वसामान्य तरुण- तरुणींना शिक्षण घेणे, शिक्षण घेतल्यानंतर नोकरी मिळविण्याकरीता खुप अडचणींचा सामना करावा लागत असतो. या समस्यांना विचारात घेवुन गडचिरोली पोलीस दल युवकांना रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी सदैव तत्पर आहे.

पोलीस अधीक्षक कार्यालय, नागरी कृती शाखेअंतर्गत रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात येत असते, या रोजगार मेळाव्या अंतर्गत हैद्राबाद येथील **एएआयएमएस प्रोटेक्शन सर्विसेस हैद्राबाद या कंपनी** या ठिकाणी मा. पोलीस अधीक्षक श्री. अंकित गोयल सो. यांचे संकल्पनेतुन व मार्गदर्शनाखाली तसेच मा. अप्पर पोलीस अधीक्षक श्री. समीर शेख सो., अप्पर पोलीस अधीक्षक समया मुंडे सो., उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. प्रशांत रामेश्वर स्वामी सो. यांचे नेतृत्वाखाली उपविभाग सिरोंचा हद्दीतील ३९ बेरोजगार तरुणांना **'सुरक्षा रक्षक'** या पदावर निवड करुन देण्यात आले.

सदरवेळी उपस्थित निवड झालेल्या तरुणांनी गडचिरोली पोलीस दलाच्या रोजगार मेळावा या उपक्रमाला शुभेच्छा देत, मा. पोलीस अधीक्षक श्री. अंकित गोयल सो. यांचे आभार मानत या नंतर देखील अशाच प्रकारच्या रोजगाराची अपेक्षा गडचिरोली पोलीस दलाकडून करण्यात यावी व दुर्गम- अतिदुर्गम भागातील तरूणांना रोजगार उपलब्ध करुन द्यावा असे मत व्यक्त केले.


उप विभागीय पोलीस अधिकारी कार्यालय सिरोंचा
जिल्हा - गडचिरोली